पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३३ • ऑगस्ट २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने सफाई कामगारांना सदनिकांचे वाटप

भारतीय स्वातंत्र्यदिना निमित्त दिनांक १५ ऑगस्ट, २०१३ रोजी पुणे महानगरपालिकेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत सुमारे ४५ चतुर्थश्रेणीतील पात्र लाभार्थी सफाई कर्मचाऱ्यांना वारजे येथील प्रकल्पातील इमारत क्रमांक जी मधील ४५ सदनिकांच्या चाव्या सुपूर्त करण्यात आल्या.



स्वातंत्र्यदिनानिमित्त पुणे महानगरपालिकेच्या प्रांगणातील महात्मा ज्योतीबा फुले यांचे पूर्णाकृती



पुतळ्यास मा. महापौर सौ.वैशाली बनकर तसेच मा.उपमहापौर श्री. दिपक मानकर यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

तदनंतर मा. महापौर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी सुरक्षा विभागाच्या वतीने सुरक्षा अधिकारी संतोष पवार यांच्या नेतृत्वाखाली मानवंदना देण्यात आली. मा. महापौर व मा. उपमहापौर यांनी मानवंदना स्विकारली.

भारतीय स्वातंत्र्यदिनाचे निमित्ताने एकूण ४५ सफाई कर्मचाऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत सदनिकांच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले. पुणे महानगरपालिकेच्या हिरवळीवर सदर कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना महापालिका आयुक्त महेश पाठक यांनी सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांना सदनिकांचा लाभ मिळवून देण्याकरिता मा.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट), श्री. मंगेश जोशी, उप आयुक्त (समाजकल्याण), श्री.डी.पी.मोरे, उप आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन विभाग, श्रीमती पूनम मेहता, बीएसयुपी विभाग प्रमुख, मा.अतिरिक्त नगर अभियंता (प्रकल्प), मा.उप आयुक्त (वि.का.क्र.१ ते ४) पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या जनरल सेक्रेटरी मुक्ता मनोहर यांनी अतिशय मोलाची व महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

कर्मचाऱ्यांना तेथील वातावरण चांगले ठेवणे त्याचबरोबर सदनिकांमधील देखभाल दुरुस्ती वेळोवेळी करुन आवश्यक नाममात्र खर्चही करणे आवश्यक आहे. ही योजना खऱ्या अर्थाने कर्मचाऱ्यांकरिता लाभदायी ठरलेली आहे. या योजनेंतर्गत २५ वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा झालेल्या तसेच सेवेत असताना मृत्यु झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत सदनिका देण्यात येते. सदर योजना समाजकल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येत आहे.

या प्रसंगी मा. महापौर यांचे समयोचित भाषण झाले. मा. दिपक मानकर, उप महापौर, मा.विशाल तांबे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. सौ.सुमनताई पठारे, अन्य पदाधिकारी, श्री. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. प्रकाश हरकुडली, अभियंता संघाचे सुनिल कदम, उप आयुक्त समाजकल्याण विभागाकडील कर्मचारी वर्ग, लाभार्थी कर्मचारी उपस्थित होते.

सदर प्रसंगी मा. महापौर, मा.महा.आयुक्त, मा.मधुकांत गरड, उप आयुक्त, मा.विजय दहिभाते, सह महापालिका आयुक्त, मा.मंगेश जोशी, उप आयुक्त, समाजकल्याण, मा.माधव जगताप, उप आयुक्त (अतिक्रमण), मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा.डी.पी.मोरे, उप आयुक्त (झोनिपु), मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी, बीएसयुपी योजनेच्या श्रीमती पूनम मेहता, श्रीमती आरती डोळस, पुणे मनपा कर्मचारी संघटनेच्या सरचिटणीस श्रीमती मुक्ता मनोहर यांचे हस्ते पात्र लाभार्थ्यांना सदनिकांच्या चाव्या वितरित करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संदिप मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन मा. मुक्ता मनोहर यांनी केले.

## पुणे महानगरपालिका भवनाच्या आवारात एटीएम सुविधा सुरु




पुणे महानगरपालिका अधिकारी/ कर्मचारी यांच्या सोयीसाठी मुख्यलेखापाल कार्यालयाच्या प्रस्तावानुसार पुणे महानगरपालिका भवनामध्ये बँक ऑफ महाराष्ट्र यांचेतर्फे ए.टी.एम मशिन बसविण्यात आले. सदर ए.टी.एम. मशिनचे उद्घाटन मा. श्री. महेश पाठक, महापालिका आयुक्त यांचे शुभ हस्ते दिनांक २९ ऑगस्ट, २०१३ रोजी करण्यात आले. सदर उद्घाटन कार्यक्रमासाठी मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ), मा. सौ.उल्का कळसकर, मुख्यलेखापाल, मा. श्री. आर.टी.शिंदे, उप आयुक्त (भूमि जिंदगी), मा. श्री. श्रीनिवास कंदुल, विकास अभियंता, विद्युत, मा. श्री. बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा. श्री. पी.एन.देशपांडे, महाप्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, मा. डॉ. राजेंद्र श्रीवास्तव, मुख्य प्रबंधक, मा. सौ.अंजली क्षीरसागर, शाखा प्रबंधक, मा. सौ. विद्या तिनईकर, विशेष सहाय्यक, बँक ऑफ महाराष्ट्र इत्यादी मान्यवर, अधिकारी व सेवकवर्ग उपस्थित होते.

मनपा भवनामध्ये ए.टी.एम.सुविधा बसविणेसाठी मा.श्रीमती उल्का कळसकर, मुख्यलेखापाल, मा. श्री. आर.टी.शिंदे, उप आयुक्त (भूमि जिंदगी), मा. श्री. संदिप खांडवे, कार्यकारी अभियंता, भवन रचना विभाग यांनी विशेष प्रयत्न केले. सदर ए.टी.एम.सुविधा सेवकांसाठी सुरु करणेबाबत पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांनी पाठपुरावा केला. तरी, सर्व सेवकांनी ए.टी.एम.सुविधेचा लाभ घ्यावा.

## नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला सबलीकरण व सक्षमीकरण केंद्राचे उद्घाटन

पुणे महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत बिबवेवाडी, कोंढवा रोड, डी.ए.डी.कॉलनी समोर फेडरल बँकेचे आवारात दिनांक १७/८/२०१३ पासून महिला सबलीकरण व सक्षमीकरण केंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्राचे उद्घाटन प्रभाग समिती अध्यक्ष मा. सौ. मानसी देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास मा.कविता वैरागी, मा.भरत वैरागी, मा. अस्मिता शिंदे, मा.श्रीनाथ भिमाले, मा. राजेंद्र शिळीमकर, मा. सुनिल कांबळे, मा. हनुमंत नाझीरकर, प्रकल्प संचालक, नागरवस्ती विकास योजना, मा. सुनिल गायकवाड, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय, श्री. संजय रांजणे, प्रोग्राम ऑफिसर, वस्तीसेविका सौ.सुजाता टिळेकर, बिबवेवाडी विभागातील समुहसंघटिका व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सदर केंद्राचा उद्देश वस्तीपातळीवरील व अल्प उत्पन्न गटातील महिलांसाठी कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन, महिलांविषयी कायदे, महिलांचे मानसिक वैचारिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या सक्षमीकरण करणे हा आहे. याव्यतिरिक्त या केंद्रामध्ये महिला आर्थिक सबलीकरणासाठी पुणे मनपाच्या, महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्या सर्व योजना, जिल्हा महिला बाल कल्याण समितीच्या योजना व बँकेच्या योजना, महिला आरोग्याबाबत योजनांची माहिती महिलांना उपलब्ध होणार आहे. तसेच, पुणे मनपा हद्दीतील गरजू, अत्याचारीत महिलांना कायदेशीर मदत मोफत देणे हा आहे. कायद्याचा आधार घेवून महानगरपालिकेच्या वकिलांमार्फत केसेस मोफत सोडविल्या जाणार आहेत. महिलांचे संघटीकरण, स्वसंरक्षण, स्त्री अस्तित्व ओळख, महिलांकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन याबाबत जाणीव जागृती कार्यक्रमातून होणार आहे. महिला दक्षता कमिटी, महिला सहाय्य कक्ष, पोलिस चौकी, इत्यादी विषयी माहिती देण्यात येणार आहे. पुणे शहरातील इतर संस्थांची माहिती व मदत या सबलीकरण केंद्रातून मिळणार आहे. वैकल्पिक वाद निवारण केंद्र तसेच तात्पुरत्या निवाऱ्याची सोय इत्यादी मदत केली जाणार आहे.

मा.श्री. हनुमंत नाझीरकर यांनी महिला सबलीकरण केंद्राविषयी सविस्तर माहिती दिली. पुणे शहरात ५ कौटुंबिक सल्ला केंद्रे सुरु असून नव्याने १० केंद्रे क्षेत्रीय कार्यालयात सुरु होणार आहेत. प्रत्येक केंद्रात आलेली केस ही गोपनीय असणार आहे. प्रत्येक केसला परिस्थितीनुसार सल्ला व कायदेशीर मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच, महिलांनी सक्षम कसे व्हावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास बिबवेवाडी विभागातील १५० महिला उपस्थित होत्या.

## संपादकीय...

### गैरहजेरी (Absenty)

पुणे महानगरपालिकेतील विविध खात्यांमध्ये सेवक विनापरवाना गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द कशा प्रकारे कारवाई करण्यात यावी याबाबत खात्याधिकाऱ्यांमध्ये साशंकता निर्माण होते. वास्तविक पाहता पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वर्तणूक नियमानुसार सेवकाने कार्यालयात वेळेवर उपस्थित राहून खात्याधिकाऱ्याने सोपविलेले काम करणे आवश्यक आहे. असे असताना विनापरवाना गैरहजर सेवकाविरुध्द कारवाई न करणे किंवा दीर्घ काळ लोटल्यानंतर संबंधितांविरुध्द कारवाई करणेबाबत विचारणा करणे ही बाब प्रशासकीयदृष्ट्या संयुक्तिक होत नाही. त्यामुळे जे सेवक दीर्घ काळ विनापरवाना गैरहजर असतात किंवा सतत गैरहजर राहतात त्यांच्या गैरहजेरीमुळे खात्याची गैरसोय होते. तसेच, अशा सेवकांविरुध्द योग्य ती कारवाई झाली नाही तर गैरहजर राहण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. यामुळे महानगरपालिका प्रशासनाची वेळोवेळी गैरसोय होवून प्रशासनास उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून काम करवून घ्यावे लागते व साहजिकच गैरहजर व्यक्तीच्या कामाचा बोजा इतर कमचाऱ्यांवर टाकला जातो. अशा गैरहजर सेवकांविरुध्द वेळीच कारवाई केल्यास सेवकांच्या गैरहजर राहण्याच्या अनिष्ट प्रवृत्तीस प्रतिबंध होवू शकेल.

गैरहजर सेवकांबाबत काय कारवाई करावी याबाबत सेवकांना माहिती नसल्याने व त्यामुळे कारवाई न केल्यामुळे गैरहजर सेवक वर्ष, दोन वर्षे, पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी गैरहजर राहिले व नंतर ते निधन पावले तरी अशा सेवकांच्या वारसांना सर्व फायदे देणे भाग पडते. अशा प्रकरणी महानगरपालिका प्रशासनास मोठे आर्थिक नुकसान होते. त्या दृष्टीने गैरहजर राहणाऱ्या सेवकांविरुध्द पुढीलप्रमाणे कारवाई केल्यास गैरहजर सेवकांबाबत प्रश्न निर्माण होणार नाहीत.

१. जे सेवक सातत्याने गैरहजर राहतात त्यांचे विरुध्द ताकीद देणे, दंड करणे, वेतनवाढ स्थगित करणे, इत्यादी शिक्षा क्रमाने करण्यात याव्यात.

२. उपरोक्त शिक्षा देवूनही सेवकांच्या वर्तनात सुधारणा न झाल्यास त्याला निलंबित न करता खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात यावी व खातेनिहाय चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या निष्कर्ष अहवालानुसार संबंधित सेवकास पदावनत करणे किंवा नोकरीतून कमी करणे या शिक्षा देण्यात याव्यात.

३. जे सेवक विना परवाना गैरहजर राहतात त्यांच्या अनुपस्थितीचा कालावधी गैरहजेरी समजण्यात यावा. सदर अनुपस्थितीचा कालावधी बिन पगारी रजा म्हणून मान्य करण्यात येवू नये.

४. महानगरपालिका सेवा विनियमातील नियम क्र. १८ नुसार एखादा सेवक रजा घेवून अगर रजेशिवाय सतत पाच वर्षे अनुपस्थित राहिल्यास त्याचा सेवेतील हक्क संपुष्टात येतो. ही बाब विचारात घेवून जे सेवक सतत पाच वर्षे कामावर गैहजर आहेत, त्यांना नोकरीतून कमी करण्यात यावे. अशा प्रकरणी कारणे दाखवा नोटीस देणे, आरोपपत्र बजावणे, खातेनिहाय चौकशी करणे, इत्यादी कृतींचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही.

५. बदली अगर रोजंदारीतील सेवक गैरहजर राहिल्यास त्यांची सेवा त्वरीत संपुष्टात आणावी व त्यांना कमी केल्यानंतर पुन्हा कामावर घेण्यात येवू नये.

६. दीर्घ काळ विना परवाना गैरहजर राहणाऱ्या सेवकांविरुध्द खात्याकडून कोणतीही कारवाई केली नसल्यास व अशा सेवकाने कामावर हजर करुन घेणेस विनंती अर्ज दिल्यास त्यास कामावर रुजू करुन घ्यावे.

७. अशा सेवकास तो ज्या खात्याच्या नियंत्रणाखाली काम करीत असेल त्या खात्याच्या मा. खातेप्रमुखाने कारणे दाखवा नोटीस देवून त्याचा खुलासा मागवावा.

८. अशा सेवकाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्यास त्याचेवर आरोपपत्र ठेवून खातेनिहाय चौकशी करण्यात यावी. मात्र अशा सेवकास आरोपपत्र हे नेमणूक करणाऱ्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने बजावण्यात यावे.

९. खातेनिहाय चौकशीमध्ये सेवक दोषी आढळल्यास त्यास नोकरीतून कमी करण्याची कारवाई करण्यास हरकत नाही.

गैरहजर सेवकांबाबत उपरोक्त पध्दतीने कारवाई केल्यास विनापरवाना गैरहजर राहण्याच्या प्रवृत्तीस निश्चितच आळा बसेल. तसेच, गैरहजर सेवकांमुळे इतर सेवकांवर पडणारा अतिरिक्त कार्यभारही कमी होईल. यास्तव पुणे महानगरपालिकेतील अधिकारी/सेवकांनी गैरहजर सेवकांबाबत दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. उपरोक्त कार्यपध्दतीचा अवलंब केल्यास प्रशासकीय काम करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देखील प्रशासकीय कारवाईस सामोरे जावे लागणार नाही.

गैरहजर सेवकांबाबत कारवाई करण्यापूर्वी संबंधित विभागातील विभाग प्रमुख किंवा हजेरीवर नियंत्रण ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून दरमहा हजेरीबाबत आढावा संबंधित खातेप्रमुख यांनी घेतल्यास व विनापरवाना सेवकांबाबत कारवाई केल्यास गैरहजेरीबाबत प्रश्न निर्माण होणार नाहीत. याबाबत सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

## ओळख गुणवंताची

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री. रविकांत किसन चव्हाण, मोकादम, येरवडा क्षेत्रीय कार्यालय यांची ओळख करुन घेणार आहोत. श्री. रविकांत चव्हाण हे लहानपणापासूनच अत्यंत कष्टाळू होते. त्यांचे वडिल रेल्वे विभागात बिगारी होते. आई पुणे महानगरपालिकेमध्ये बदली कामगार म्हणून सफाई सेविकेचे काम करीत होते. कुटुंबामध्ये सातजण होते. कुटुंब मोठे व कमवणारे कमी असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची होती. श्री. चव्हाण यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण मुंढवा येथील लोणकर माध्यमिक विद्यालय येथे झाले. त्यांची आई बदली काम करता करता कायम झाली. तिच्या सेवानिवृत्तीनंतर रिक्त जागी श्री. चव्हाण यांची दिनांक ६/१०/१९९४ रोजी मेहतर पदावर हडपसर क्षेत्रीय कार्यालयाकडे नियुक्ती करण्यात आली. श्री. चव्हाण यांची काम करण्याची पध्दत पाहून त्याना ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाकडे मोकादम म्हणून काम देण्यात आले. मोकादमाचे काम करताना वॉर्डमधील साफसफाईचे आणि कचऱ्याचे नियोजन अत्यंत उत्कृष्ट पध्दतीने व चांगल्या प्रकारे ते पार पाडत. तसेच अस्वच्छतेवर दंडात्मक कारवाई करुन नागरिकांमध्ये कचऱ्याविषयी जनजागृती केली. उघड्यावर विधी करणाऱ्यांवर, गाई म्हशींच्या गोठ्यांवर तसेच लेबर कॅम्पवर कडक कारवाया केल्या. त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना सन २००६ मध्ये संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानमध्ये सक्रीय सहभाग घेवून स्वच्छता जनजागृती समाज प्रबोधन केल्यामुळे उत्कृष्ट प्रशस्तीपत्रक देवून गौरविण्यात आले. आदर्श मोकादम स्पर्धेमध्ये मानद सल्लागार, संकल्प स्वच्छता अभियान विश्वस्त डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्ट पुणे यांचेकडून श्री. चव्हाण यांना सन २००८ मध्ये आदर्श मोकादम सन्मानपत्र देवून गौरविले.

सन २००९ मध्ये श्री. चव्हाण यांची बदली येरवडा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. १ धानोरी येथे झाली. तेथील नगरसेवक मा.सौ.रेखा टिंगरे, मा.श्री.अनिल टिंगरे यांनी त्यांच्या कामाबद्दल अभिनंदन केले. दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० रोजी आबानगरी ते खाणीदरम्यान मेन रोडचे काम करुन घेत असताना श्री. चव्हाण व श्री.घावटे, आरोग्य निरीक्षक यांना एक अनोळखी बॅग दिसली. बॅग उघडून पाहिल्यानंतर त्यामध्ये



**श्री. रविकांत चव्हाण**
**येरवडा क्षेत्रीय कार्यालय**

रु.३,९४,७००/- आढळून आले. तसेच, साधारण ८-१० क्रेडिट कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना मिळाला. त्या परवान्यावरील पत्त्यावर शोध घेवून विसरलेल्या बॅग मालक यांची शहानिशा करुन श्री. चव्हाण व श्री. घावटे यांनी सदर बॅग त्यांना परत केली. त्याबद्दल काहीही बक्षिस घेतले नाही. याबाबत प्रभागातील सर्व गणेशोत्सव मंडळे, मा.नगरसेवक, मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिकेतील सर्व मा.अधिकारी, पुणे महानगरपालिका कामगार युनियन यांनी याबाबत त्यांचे अभिनंदन केले. प्रामाणिकपणाचा आदर्श निर्माण करणारे कर्मचारी, असा त्यांचा उल्लेख करण्यात आला. संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त वंदेमातरम संघटना, खडकी यांनी श्री. चव्हाण यांना गुणवंत कामगार पुरस्कार, २०११ प्रदान करुन गौरविण्यात आले. कलशरत्न स्वयंसेवी संस्था यांनी त्यांना आदर्श नागरिक गौरव पत्र दिले. चंद्रकांत जंजिरे प्रतिष्ठान यांनी श्री. चव्हाण यांना गुणवंत कामगार प्रशस्तीपत्रक दिले. ह्युमन राईट्स असोसिएशन फॉर प्रोटेक्शन गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांनी त्यांचा सत्कार करुन गुणवंत कामगार प्रशस्तीपत्रक दिले. पुणे जनकल्याण ट्रस्ट, विश्रांतवाडी यांनी त्यांचा गौरवपत्रक देवून सत्कार केला. वाल्मिक समाज वॉर्ड बोपोडी यांनी प्रामाणिक प्रमाणपत्र देवून त्यांना सन्मानित केले. दिनांक २७ मे, २०११ रोजी अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस पुणे शहर संघटनेच्या ४७ व्या वर्धापन दिनानिमित्त कामगार मेळाव्यामध्ये प्रामाणिकपणाचा आदर्श असे संबोधित करुन प्रशस्तीपत्र दिले. तसेच, एस.एल.शिर्के चॅरिटेबल ट्रस्ट यांनी आदर्श नागरिक पुरस्काराने गौरविले. राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या अध्यक्ष कमलताई गुर्जर यांनी अभिनंदन करुन त्यांना गुणवंत कामगार गौरव पुरस्कार देवून त्यांना गौरविले. तसेच, पुणे महानगरपालिका कामगार युनियननतर्फेही त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री. चव्हाण यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेवून कामगार कल्याण निधीतर्फे त्यांना गुणवंत कामगार पुरस्कार प्रदान करुन गौरविण्यात आले.

श्री. चव्हाण यांच्या भविष्यकालीन वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## आली गं माहेरवाशीण !

*आल्या आल्या महालक्ष्मी,*
*सोन्या रुप्याच्या पावलानं...*
*आल्या आल्या गौरी,*
*हळद-कुंकवाच्या पावलानं..*

भारत हा सृष्टीने, सणांनी नटलेला असा देश आहे. प्रत्येक महिना हा विविध सणांनी समृध्द आहे. चैत्रात गुढीपाडवा, जेष्ठात वटपोर्णिमा त्याचप्रमाणे भाद्रपद महिन्याची सुरवातच मुळी हरतालिका, गणपती, ऋषिपंचमी आणि गौरीच्या तयारीच्या लगबगीने होते.

हरतालिकेचे व्रत भाद्रपद महिन्यातील पहिल्या तृतियेस केले जाते. पार्वतीने शंकराला इच्छित वर म्हणून प्राप्त करुन घेण्यासाठी हे व्रत केले. त्याचप्रमाणे बायका अखंड सौभाग्यासाठी व कुमारीका चांगला पती मिळावा म्हणून हे व्रत करतात. नदीच्या वाळूपासून ३ शिवलिंगे तयार करुन किंवा पार्वती शिवाची प्रतिमा आणून ही पूजा केली जाते.

यानंतर घरोघरी गणपतीची प्रतिष्ठापना केली जाते. कोणाकडे दिड दिवस, पाच दिवस, सात दिवस तर कोणाकडे दहा दिवस गणपती बसविले जातात. दहा दिवसांच्या गणपतीबरोबरच अनंताचेही काही जणांकडे पूजन केले जाते.

*लाडके गौराय कशी येशी*
*पानी पडलं नय (नदी) भरलं..*

गणपती पाठोपाठ येणाऱ्या माहेरवाशिणींचे गौराई आली, सोन्याची पावले असे म्हणतच स्वागत केले जाते. भाद्रपद शुक्ल पक्षातील अनुराधा नक्षत्रावर गौरीचे आवाहन, जेष्ठा नक्षत्रावर पूजन आणि मूळ नक्षत्रावर विसर्जन होते. गौरी आणण्याच्या पध्दतीत वैविध्य दिसते. काही ठिकाणी खड्याच्या गौरी तर काही उभ्या गौरी, काही ठिकाणी सुगडाच्या गौरी तर काही ठिकाणी पाना-फुलांच्या उतरंड मांडलेल्या या सर्वांनाच मनुष्याकृती

**सौ.सुचेता महाबळेश्वरकर**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

आकार देवून मुखवटा असलेली गौर आपल्याला पहायला मिळते. मुख असल्यावर प्राण आहे, चैतन्य आहे या भावनेतूनच गौरी मुखवटा लावून गौरीची पूजा केली जाते.

गौरीचा सण हा खास माहेरवाशिणींचा समजला जातो आणि त्याचा प्रत्यय पुढील लोकगितातून येतो :

***बंधु येईल माहेरी न्यायला***
***गौरी गणपतीच्या सणाला।।***

सौभाग्यप्राप्ती व समृध्दीसाठी महालक्ष्मीचे पूजन केले जाते. जेष्ठा (सोवळ्याचे) आणि कनिष्ठा (ओवळ्याचे) या दोघी घरात विराजमान झाल्या की जेष्ठासमोर तांदळाची व कनिष्ठासमोर गव्हाची रास केली जाते. गौरी बसविल्यावर रात्री काही ठिकाणी बाजरीची भाकरी व शेपूची भाजी तर काही घरात ज्वारीची भाकरी व मेथीची भाजी असा नैवेद्य दाखविण्यात येतो.

दुसऱ्या दिवशी पंचपक्वानांचा नैवेद्य पुरणपोळी, सोळा भाज्या, सोळा कोशिंबीरी करण्यात येतात. गौरीपुढे विविध फराळ जसे लाडू, करंज्या, चकल्या, शेव मांडण्यात येतात. काही जणांकडे घावण-घाटल्याचा नैवेद्य केला जातो.

आजही सर्वजण नोकरी निमित्ताने बाहेर असले तरी या सणामुळे एकत्र जमून आनंदाने सण साजरा करतात. संध्याकाळी हळदी कुंकवाचा कार्यक्रम केला जातो. त्या दिवशी प्रत्यक्ष गौराई येवून हळदकुंकू लावून जातात अशी श्रध्दा आहे.

सकाळी कुमारिका, दुपारी सवाशिण व संध्याकाळी पोक्त बायको या तीनही कळा गौराईच्या रुपात दिसतात.

गौरी विसर्जनाच्या वेळी नैवेद्यात मुरडीचा कानवला करतात. मुरडीप्रमाणे तू पुढल्यावर्षी परत ये हा संकेत त्यात असतो. गौरी ही देवता समृध्दी, संपन्नता, सौभाग्य चिरंतन राहण्याच्या उद्देशानेच पुजली जाते. जेव्हा गणपती गौरीचे विसर्जन केले जाते, तेव्हा घरातील समृध्दी अखंड राहण्यासाठी वाळू आणून ती घरभर टाकली जाते. यातूनच समृध्दी चिरकाल अबाधित राहो हिच भावना दिसते.

अशा प्रकारे तिला सजवून खाऊपिऊ घालून तिचे माहेरपण करुन तिला परत पाठविले जाते.

# १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन

१५ ऑगस्ट, १९४७ या दिवशी भारत ब्रिटीशांच्या जोखडच्यापासून स्वतंत्र झाला. प्रतिवर्ष १५ ऑगस्ट हा दिवस भारताचा स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्यात येतो. हे राष्ट्रीय पर्व संपूर्ण देशभर अमाप उत्साहात साजरे केले जाते. कोणत्याही देशासाठी स्वातंत्र्यदिन म्हणजे एक अभिमानाचा आणि गौरवाचा दिवस असतो. या विशेष पर्वणीला, जुलमी ब्रिटिश राजवटीच्या पंज्यापासून मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी जीवाचे रान करणाऱ्या आणि आयुष्य वेचणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली वाहिली जाते. सर्वप्रथम व्यापारासाठी म्हणून आलेल्या ब्रिटिशांनी टप्प्याटप्प्याने संपूर्ण भारताचे शासन काबीज केले.

१५ ऑगस्ट, १९४७ च्या मध्यरात्रीच्या ठोक्यावर भारताने ब्रिटिश राजवटीच्या शृंखला तोडून स्वातंत्र्य मिळविले. ती सबंध देशभरासाठी उत्सवाची रात्र ठरली. १५ ऑगस्ट म्हणजेच भारताने स्वातंत्र्य मिळविलेल्या दिवशी देशभर ध्वजारोहण आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम ठेवून स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर प्रमुख कार्यक्रम असतो. तेथे पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण होते आणि तोफांनी ध्वजाला सलामी दिली जाते.

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ६६ वर्षे झाली. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक क्रांतिकारी, स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. स्वराज्य मिळविण्यासाठी टिळक़, गांधी, पटेल, सुभाषचंद्र बोस या महापुरुषांच्या नेतृत्वाखाली अनेक जण स्वातंत्र्याच्या लढाईत धारातीर्थी पडले, देशासाठी आपलं बलिदान दिलं. स्वराज्याचं स्वप्न अखेर १५ ऑगस्ट १९४७ साली सत्यात उतरलं. ब्रिटिश राजवटीतून भारत स्वतंत्र झाला. At the stroke of the midnight hour, when the world sleep, India will awake to life and freedom. A moment comes but rearly in history, when we step out from old to the new.... India discovers herself again. Pandit Nehru.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला पंडित नेहरुंनी दिलेल्या या भाषणात भारताने स्वातंत्र्यासाठी केलेला संघर्षमयी प्रवास उलगडला आणि त्याबरोबरच भारताने आपलं स्वातंत्र्य परत मिळवल्याचं जगाला सांगितले. भारत जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून ओळखले जाते. भारतात असलेल्या सांस्कृतिक तसेच धार्मिक विविधतेमुळे भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा अनेकांनी भारत हा देश एकसंध राहणार नाही असे भाकित वर्तवले होते. परंतु विविधतेत एकता हेच भारताचे वैशिष्ठ्य ठरले आणि आज ६६ वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर वाटचालीत भारताच्या एकात्मतेला कुठेही तडे गेले नाहीत. भारताने तंत्रज्ञान, विज्ञान, शेती, शिक्षण अशा विविध क्षेत्रात प्रगती केली. आज भारताकडे स्वत:चा आण्विक साठा आहे. भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचं म्हटलं जातय.

भारत ज्या वेगाने प्रगती करत आहे त्या किंबहुना त्याच्या दुप्पट वेगाने भारत विविध समस्यांनी वेढला आहे. प्रश्न पडतो की खरच आपण स्वतंत्र आहोत का ? ब्रिटिश राजवटीतून आपण कधीच मुक्त झालो. पण महागाई, दहशतवाद, भ्रष्टाचार, स्वैराचार, यात मात्र अडकलो आणि यातून दिवसेंदिवस बाहेर पडणं कठिण होत चाललय. परदेशियांशी लढणं सोपं आहे पण स्वकियांशी तितकच कठीण.

आपल्याला महान आणि तडफदार नेते, राजकारण्यांचा इतिहास आहे. पण खेद याचा वाटतो की, या इतिहासाची पुनरावृत्ती होत नाही. आज आपल्या देशात भ्रष्टाचार एवढा बोकाळला आहे की, आणखी काही दिवसांनी तो एक शिष्टाचार होतो की काय अशी भिती निर्माण झाली आहे. महागाई, भ्रष्टाचार, दहशतवाद यांची झळ बसणारा सामान्य माणूस बोथट झाला आहे. किती आणि कोणाला प्रतिकार करणार म्हणून एकतर सहन करणं नाहीतर विसरणं असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. याशिवाय ते जगूच शकत नाही. नुकतेच पुण्यात झालेले स्फोट त्यानंतर सीएसटी वर झालेला हिंसाचार ही याची ताजी उदाहरणे आहेत. देशातल्या जनतेच्या सहनशक्तीला खरच दाद द्यायला हवी.

आर्थिक महासत्तेची स्वप्न बघणाऱ्या भारतात दारिद्र्य रेषेखालील जनतेला अन्न, निवारा या जीवनावश्यक गोष्टींची भ्रांत आहे. आपल्या तिरंग्याखाली तीन रंग शांतता, सामर्थ्य, सुबत्ता यांचे प्रतिक आहेत. हिरवा सुबत्तेचं, भगवा सामर्थ्याचं आणि पांढरा शांततेचं. आज तिरंगा फडकवताना मनात येतं की खरच भारतात शांती आहे ? महासत्ता बनण्याचं सामर्थ्य आहे ? शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणाऱ्या कृषीप्रधान भारतात सुबत्ता आहे ? आज स्वातंत्र्य दिन नागरिकांसाठी फक्त बँक हॉलिडे झाला आहे.

या दिवशी ड्राय डे असूनही पर्यटन स्थळी मद्यपींना आवर घालण्यासाठी पोलिस बंदोबस्तात वाढ करावी लागते. खरच स्वातंत्र्याची किंमत कशी कळणार आपल्याला. कदाचित आपण आणखी काही वर्षांनी स्वातंत्र्याची ७५ री धुमधडाक्यात साजरी करु पण तेंव्हा चित्र खरेच पालटले असेल अशी आशा व्यक्त करु या. जहा डाल डाल पे सोने की चिडिया करती है बसेरा वो भारत देश है मेरा या ओळी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी पुन्हा एकदा क्रांती घडणं आवश्यक आहे. तरच आपलं महासत्ता बनण्याचं स्वप्न साकार होईल.

देशातील सात कोटीपेक्षा जास्त लोक असे आहेत ज्यांनी १५ ऑगस्ट, १९४७ ला देश स्वातंत्र्य होताना पाहिला. माहत्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या नेतृत्वाखालील देश मोठी प्रगती करेल अशी त्यांची अपेक्षा होती. राजा आणि प्रजा, गरीब आणि श्रीमंत, शहरी आणि ग्रामीण, ब्राह्मण व शुद्र असे भेद मिटतील. प्रत्येकाची स्थिती बदलून प्रगतीचा रस्ता त्यांच्यासाठी खुला होईल. गरीबी, उपासमारी, बेरोजगारी, महागाई, रोगराई, निरक्षरता, भ्रष्टाचार याचा विचारही कुणाच्या डोक्यात नसावा. कायदा, घटना यावरचा लोकांचा विश्वास उडेल अशा काही घटना घडतील असा विचारही कुणी केला नसेल. स्वातंत्र्याला ६६ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रतिक्रिया विचारली तर त्यांचे उत्तर काय असेल ? नक्कीच यांच्यापैकी कुणीच खूप दु:खी नसेल. फारसे निराशही कुणी नसेल. चांगल्या आणि मनाला दु:ख देणाऱ्या घटनाही या काळात घडल्या. स्वातंत्र्याचा लाभ ज्यांना मिळाला ते आज अतिशय आनंदी जीवन जगत आहेत. पण अनेकांसाठी हे स्वातंत्र्य कुचकामी असल्याची भावनाही आहे.

देशातील अनेक वृध्दांनी, ज्यांनी ब्रिटिश काळ पाहिला आहे, त्यातील अनेक जण सध्याच्या स्वातंत्र्यानंतरच्या स्वैराचारावर तोंडसुख घेताना दिसतात. नैतिक अध:पतन, अतिपैशाने फिरलेली तरुण पिढीची मती, त्यांच्याकडून होणारा वारेमाप खर्च, भ्रष्टाचार, महागाई, गुन्हेगारी, भांडवलशाही आणि त्याला जोडून येणाऱ्या साऱ्या प्रश्नांवर ते भारताच्या सध्याच्या प्रश्नांचे खापर फोडतात. गेल्या काही वर्षातील प्रगतीची झेपही त्यांना सोसवत नाही. प्रगतीचा आवाकाही त्यांच्या मर्यादित येत नाही. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून भारतात होणाऱ्या गुंतवणूकीत त्यांना भारताला पुन्हा गुलामगिरीच्या शृंखलेत घालण्याचा डाव दिसतो आहे.

त्यांच्या मते इंग्रजांचा काळ किंवा राजे-महाराजांचा काळ चांगला होता. वस्तूंच्या किमती कमी होत्या. शिस्त, एकत्र कुटुंबपध्दती, जाती-धर्माचे महत्व, मर्यादित असलेला भ्रष्टाचार, फॅशनचा अभाव, गुन्हेगारीचा कमी असलेला आकडा आदी उदाहरणे त्यांच्याकडून दिली जातात. त्यावेळच्या किराणाचे भाव तोंडावर फेकून महागाई किती कमी होती असे सांगतात. पण हे सांगताना ते हे विसरतात की त्यावेळी व्यक्तीचे उत्पन्न किती होते. शेतात पीक किती येत होते. पाणी किती लांबून आणावे लागत होते. शौचालये कशी होती. शहरात जाण्यासाठी बैलगाडी होती. शिस्त होती, पण ब्रिटिशांच्या, राजाच्या शिपायांच्या काठ्या कशा खाव्या लागत. सारासार विचार केल्यास भारताची स्थिती आज एवढीही खराब नाही. स्वातंत्र्यापूर्वीचा भारत आणि आताचा भारत यांची तुलना केल्यास अनेक चांगले मुद्देही आढळतात.

स्वातंत्र्याच्या साठ वर्षानंतरही देशात लोकशाही अस्तित्वात आहे. ही मोठी कमाई आहे. अनेक राजकीय पक्षांची मोट बांधलेल्या आघाड्या चांगला कारभार करीत आहेत. हुकुमशाही देशात येण्याची शक्यताही नाही. पाकिस्तानबरोबर झालेल्या युध्दात आपण त्यांचे नाक ठेचले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेत भारताची भूमिका महत्वाची राहिली आहे. देशाच्या लोकसंख्येबरोबरच प्रती व्यक्ती उत्पन्न, खर्च, बचत आणि गुंतवणूक यातही वाढ झाली आहे. जगण्याचा स्तर वाढला आहे. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास कामांना गती देण्यात आली आहे. रशिया आणि समाजवादी देशच नाही, तर अमेरिका, ब्रिटन, जपान, फ्रान्स, मॉरिशस, चीन, संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, इंडोनेशिया, थायलंड, कोरिया हे देश भारताबरोबर चांगले संबंध ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अमेरिकेने भारताबरोबर केलेला अणू करार हे तर त्याचे ताजे उदाहरण आहे.

देशात झालेले हे बदल आवडो न आवडो तुम्हाला ते स्विकारावे लागतील. या बदलाच्या प्रवाहात आपण शिरणे हे चांगले. केवळ साक्षीदार म्हणून राहण्याला काही अर्थ नाही. नव्या सोयीसुविधांचा लाभ घेवून स्वत:ला आजमावून पाहिले पाहिजे. स्वातंत्र्यासाठी जे कष्ट आपण घेतले त्याचा लाभ घेण्याची ही वेळ आहे. महागाई वाढली असेल, पण आपल्या हातात ती परवडण्याइतका पैसाही येतो आहे. त्यामुळे त्याची चिंता करायचे काम नाही. नव्या पिढीच्या नव्या प्रवाहात सामील होणे हाच योग्य आणि चांगला पर्याय आहे.

## मनपा कर्मचारी बँकेच्या सर्वसाधारण सभेची शताब्दी

कामगारांनी कामगारांमार्फत कामगारांकरिता चालविलेली व खऱ्या अर्थाने सहकार समृध्द करणारी, पुणे महानगरपालिका, शिक्षण मंडळ व पुणे महानगर परिवहन महामंडळातील कामगार, कर्मचारी, शिक्षक यांच्यासाठी असलेल्या पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हंट्स को-ऑप.अर्बन बँकेची १०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ११/८/२०१३ रोजी पार पडली.

पुण्यातील मध्यवर्ती ठिकाणी, सदाशिव पेठेमध्ये स्वत:च्या मालकीची सुशोभित वास्तू लाभलेली ही बँक संपूर्ण संगणकीकृत असून, बँकेचा शंभरावा वार्षिक अहवाल अतिशय मोहक, आकर्षक तसेच माहितीपूर्ण व संग्राह्य असा झाला आहे.

दैदीप्यमान यशाची चढती कमान पार करीत बँकेने शंभराव्या वर्षात अभिमानास्पद पदार्पण केले आहे. सभासद, ठेवीदार व खातेदार यांचा सार्थ विश्वास बँकेने संपादन केला असून सातत्याने अ वर्ग राखला आहे. शुन्य टक्के एन.पी.ए.करता वेळोवेळी बँकेला राज्यस्तरावर गौरविण्यात आले आहे. शंभर कोटींची उलाढाल असणारी ही बँक शताब्दी वर्षात पदार्पण करीत असताना, बँकेने सभासदांकरिता १०% लाभांश दिला आहे. बँकेचे विद्यमान अध्यक्ष दिलीप बागल, उपाध्यक्षा रोहिणी अंबवणे, बँकेचे व्यवस्थापक सुदेश बनकर, वरिष्ठ अधिकारी जगन्नाथ लडकत तसेच संचालक मंडळ व सर्व सेवक वर्गाच्या सहकार्याने ही अविरत प्रगती करणारी बँक, महाराष्ट्रातील पगारदार नोकरांच्या नागरी सहकारी बँकामध्ये मुकूटमणी म्हणून शोभत आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून रुजू झालेले पीएमसी बँकेचे अध्यक्ष श्री.दिलीप बागल हे आपल्यामधील गुणांमुळे संपर्क अधिकारी, विभागीय निरीक्षक पदापर्यंत पोहोचले असून, गेली १० वर्षे कर्मचारी वर्गाने त्यांना निवडून दिले आहे. संचालक, उपाध्यक्ष, अध्यक्ष पदापर्यंत आपल्या नेतृत्वगुणांमुळे ते पोहोचले आहेत.

## महापालिका सेवकांसाठी अभ्यास शिबीरे

मा. स्थायी समितीने दिलेल्या स्थायी मान्यतेनुसार पुणे महानगरपालिका कामगार युनियनमार्फत महापालिका सेवकांसाठी २-२ दिवसांची अभ्यास शिबीरे आयोजित करण्याचा स्तुत्य उपक्रम सन २००१ पासून राबविण्यात येत आहे. या वर्षी दिनांक २१ ते २४ सप्टेंबर, २०१३ या कालावधीत सदर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली.

या शिबीरामध्ये महापालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांसाठी अशा प्रकारची शिबीरे नियमितपणे आयोजित करण्यात येत आहेत. या शिबीरांमधून कर्मचाऱ्यांना गरजेनुरुप प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये महापालिकेची रचना, अत्यावश्यक व बंधनकारक कर्तव्ये, कचऱ्यापासून खत व उर्जा निर्मिती, सार्वजनिक स्वच्छता, कामगार कायदे, लाड समितीच्या शिफारशीनुसार वारस नियुक्त्या, त्यामध्ये आवश्यक असलेली कागदपत्रे, महापालिकेतर्फे राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती, कामगार कल्याण निधीची अंमलबजावणी, इत्यादींच्या अनुषंगाने महापालिका अधिकारी आणि तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करुन सेवकांना मार्गदर्शन करण्यात येते.

सर्वसाधारणपणे ८०-१०० महापालिका कर्मचाऱ्यांना चार दिवसीय प्रशिक्षण देण्यात येते. यामुळे कर्मचारी/सेवकास महापालिका कामकाजाची तोंडओळख होवून तसेच कायदे व नियमांची माहिती मिळवून त्याच्या दैनंदिन कामात कार्यक्षमता वाढीस मदत होते. अशा प्रकारची प्रशिक्षण शिबीरे मोठ्या प्रमाणावर आयोजित करणे ही काळाची गरज आहे. अशा प्रशिक्षण शिबीरांमुळे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना मनपाच्या कार्यपध्दतीचे ज्ञान प्राप्त होते.

## विवेकानंदांचे उपदेश

१. ज्याचे हृदय गरिबांसाठी कळवळते, ज्याच्या हृदयाला गरिबांसाठी पीळ पडतो त्यालाच मी महात्मा म्हणतो. एरव्ही तो दुरात्माच होय.

२. जोपर्यंत लाखो लोक भुकेने तडफडत आहेत व अज्ञानात पिचत पडलेले आहेत तोपर्यंत मी त्या प्रत्येक माणसाला कृतघ्न समजतो की जो ह्या लोकांच्या बळावर सुशिक्षित बनला आणि तरी आता त्यांच्याकडे मुळीच लक्ष देत नाही.

३. तुम्ही आपल्या बांधवांवर प्रेम करता काय? ईश्वराला आणखी कोठे शोधाल हे जे सर्व गरीब, दु:खी व दुर्बल आहेत तेच ईश्वर नव्हेत काय आधी त्यांची पूजा का करीत नाही गंगेच्या काठी विहिर खणावयास का म्हणून जाता विश्वास असू द्या की प्रेम सर्वशक्तिमान आहे. क्षुद्र नावलौकिकाची काय पर्वा, तुमच्या हृदयात प्रेम आहे ना, मग तुम्ही सर्वशक्तिमान आहात. तुम्ही पूर्ण नि:स्वार्थ आहात ना मग तुम्हाला कुणीही पराजित करु शकणार नाही. चारित्र्याचाच सर्व ठिकाणी जय होतो. मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करुन दुसऱ्याच्या हितासाठी एकजुटीने कार्य करण्यास शिका.

## माहे ऑगस्ट, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/८/१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे ऑगस्ट, १३ मधील सेवानिवृत्त ३१ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १६ वयपरत्वे व १५ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री संदिप खांडवे, कार्यकारी अभियंता, भवन रचना विभाग हे उपस्थित होते. तसेच, मा. श्री. अभिजित डोंबे, उप अभियंता,भवन रचना विभाग, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे महानगरपालिका कामगार युनियन हे उपस्थित होते. प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांना त्यांच्या सेवापूर्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व देय रकमांचा योग्य विनियोग करणेबाबत मार्गदर्शन करुन भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



तसेच, मा. प्रकाश जाधव यांनी सर्व सेवानिवृत्त सेवकांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

तदनंतर मा. खांडवे यांनी मनपाची दीर्घ सेवा केल्याबद्दल सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे आभार मानले. तसेच, त्यांना मिळणाऱ्या देय रकमांबाबत दक्षता घेणेबाबत मार्गदर्शन केले व सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सेवानिवृत्त सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अलका जोशी यांनी व आभार प्रदर्शन श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री. राजपुरे, श्री. घोलप, श्री. गेजगे, श्री. मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले.


कल्याणवार्ता
ऑगस्ट, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/१२५२/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar@punecorporation.org


## निर्वाह भत्ता

पुणे महानगरपालिकेतील ज्या सेवकांना खातेनिहाय चौकशी, फौजदारी गुन्हा, अफरातफर, इत्यादी प्रकरणांमध्ये निलंबित करण्यात आले आहे, अशा निलंबित सेवकांना त्यांच्या खातेनिहाय चौकशीचा किंवा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत निर्वाह भत्ता देणे आवश्यक आहे.

पुणे महानगरपालिकेतील काही खात्यांमधील सेवकांना याबाबत माहिती नसल्यामुळे सेवकांचा निर्वाह भत्ता आदा केला जात नाही. ही बाब कायदेशीरदृष्ट्या संयुक्तिक होत नाही.

पुणे महानगरपालिका सेवा विनियमामध्ये निर्वाह भत्ता आदा करणेकामी सेवा विनियम क्र. ५८ व ६२ मध्ये तरतुद करण्यात आली आहे. सदर तरतुदी विचारात घेवून निलंबित सेवकांना निर्वाह भत्ता आदा करणे जरुरीचे आहे.

एखादा सेवक निलंबनाधीन कालावधीमध्ये सेवानिवृत्त झाल्यास तो ज्या दिनांकाला सेवानिवृत्त होईल त्या दिनांकापर्यंतच त्यांना निर्वाह भत्ता देय होतो.

## डॉ. नरेंद्र दाभोळकर : मानवातील एक राजहंस

मौक्तिक माळेतुनी एक महान मोती गळाला ।
अष्टपैलू व्यक्तिमत्वाने जगाचा निरोप घेतला ।
चरणी तुमच्या ही समर्पित भावपुष्पमाला ।।
अंधश्रध्दा निर्मूलनासाठी केला जीवाचा आटापीटा ।
जीवनभर केलीत तुम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा ।।
हार कधीही तव मनोधैयाने न मानलीत ।
प्रयत्नांची फुले अविरत दिड शतके तोडलीत ।।
समीधासम जळूनी बहु कष्टलात मनी ।
वेचिले जीवन यासाठीच तुम्ही रात्रंदिनी ।।
तव प्रयत्नांना अखेरीस यश आले अंती ।
नाहीत तुम्ही पहावया म्हणूनी मन होय खंती ।।
जीवन नामक यज्ञकुंडात स्वप्राणांचीच दिली आहुती ।।
चंदनापरी यास्तव तुम्ही अखंड झिजलात ।
सुगंध दरवळताना मात्र तुम्ही निघूनी गेलात ।।
कधी न पडली गळ्यात प्रयत्ने फुलांची विजयमाला ।
गेल्यावरी मात्र तुम्हा अर्पण ती पुष्पमाला ।।
पुष्पासम जीवन जगलात तुम्ही खरे भले ।
जैसे कोमेजल्यावरही सुमनांचा सुगंध दरवळे ।।
त्यासम तव कार्यकर्तुत्वाचा सुगंध मागे उरे ।
कितीही लिहिले तुम्हावरही परि शब्दचि अपुरे ठरे ।।
गेल्यावरी विजयोत्सवाने तुम्हा वाहिली श्रध्दांजली ।
कोरडीच ती सुमने तुम्हांवरी बहु उधळली ।।
सुगंधीत मात्र सर्व ओंजळींना ती करुन गेली ।
प्राणांच्या आहुतीने एक रक्तरंजीत क्रांती घडली ।।
जनप्रक्षोभाच्या उसळीने शासनास जाग आली ।
रेंगाळलेल्या जादूटोणा विरोधी विधेयकास मान्यता मिळाली ।।
यासाठी परि तुम्हा स्वप्राणांचीच किंमत मोजावी लागली ।।
मरावे परि किर्तीरुपे उरावे हे वचन तुम्ही सार्थ ठरवले ।।
नराचा नारायण झालात पण त्यासाठी हौतात्म्य पत्करावे लागले ।।

अलका जोशी, सल्लागार (कामगार) कार्यालय

## आपला परिचय

जिथे असतो धन्यवाद तिथे नसतो वाद
जिथे असतो वाद तिथेच असतो घात
जिथे असती सत्याची साथ तिथे असती असत्यावर मात
जिथे असती शांती तिथे माणुसकीची वस्ती
जिथे असतो भेद भाव तिथे बसतो घावावर घाव
जिथे जावे सरळ मार्गी तिथे नाही कशाची भीती
जिथे जाती वेड्यावाकड्या मार्गी तेथे यमासारख्यांची भीती
जिथे व्यवहार सरळ तिथे नाही भेसळ
जिथे असते भेसळ त्याला काय पचणार मिसळ
जिथे असतो खरा मर्द तोच करतो रक्षण
जिथे असतो नामर्द त्याचेच होते भक्षण
जिथे असते सत्य तिथे असतो मार्ग
जिथे असते असत्य तिथे असतो गैरमार्ग
जिथे मान तिथेच सन्मान
जिथे अपमान तिथे नाही शान

श्री. संजय देवळे, पं.नेहरु स्टेडियम

## तुम्हाला मराठीविषयी ही माहिती माहित आहे का

झाशीची राणी लक्ष्मीबाई नेवाळकर यांनी हिंदीत नव्हे तर मराठीतच मी माझी झाशी देणार नाही, असे म्हटले आहे.

रशिया, ऑस्ट्रेलियासह अनेक देशांमध्ये ४४ मराठी रेडिओ केंद्रे आहेत.

हरियाणामध्ये साडेदहा लाख मराठी राहतात. कराचीत (पाकिस्तानात) नारायण जगन्नाथ विद्यालय मराठी शाळा असून तेथील विद्यार्थी गुणवत्ता यादीत उत्तीर्ण होतात.

मराठीप्रमाणे अन्य कोणत्याही भाषेतील साहित्यिकांचे दरवर्षी संमेलन होत नाही.

मराठी भाषेत ४८ पेक्षा जास्त साहित्य प्रकार आहेत आणि १३० पेक्षा जास्त कलाप्रकार असून, हा एक जागतिक विक्रम आहे.

महाराष्ट्रातील काही इंग्रजी माध्यमातील शाळांनी गणित आणि विज्ञान हे विषय मराठीतच समजून देण्यास सुरुवात केल्यानंतर विद्यार्थ्यांना ते विषय लवकर व चांगल्या पध्दतीने समजू लागले आहेत.

देशाच्या आर्थिक उत्पन्नातील सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा आहे.

सांगली व कोल्हापूरमधील मराठी माणसांचे चांदी शुध्द करण्याचे कारखाने भारतातील महत्वाच्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहेत. त्याचा या व्यवसायात फार मोठा वाटा आहे.

पूर्वी अफगाणिस्तान ते कन्याकुमारी व बडोदा ते बंगाल असे मराठी राज्य पसरले होते. तेव्हा संबंध भारतात मराठी भाषा प्रथम क्रमांकावर होती. आज मराठीचे स्थान दहावे आहे.

मराठी माणसांनी जास्तीत जास्त व्यवहार मराठीत केले तर ही गुणी भाषा वरच्या स्थानावर पोचू शकेल.

## आई

आई साठी काय लिहू
आई साठी कसे लिहू
आई साठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे
आई वरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्व मोठे

जीवन हे शेत तर आई म्हणजे विहिर
जीवन ही नौका तर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी

आई तु उन्हामधील सावली
आई तु पावसातील छत्री
आई तु थंडीतली शाल
आता यावीत दु:खे खुशाल

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
आई म्हणजे वाळवंटात प्यावं असं थंडगार पाणी

आई म्हणजे आरतीत वाजवावी
अशी लयबध्द टाळ
आई म्हणजे वेदनेनंतरची
सर्वात पहिली आरोळी............

शुभांगी आल्हाट, सल्लागार (कामगार) कार्यालय

## नागपंचमी

श्रावण महिन्यातील शुध्द पंचमीला नागपंचमी म्हटले जाते. या दिवशी नागाची पूजा केली जाते. फार पूर्वीपासून आपल्याकडे नागाला देव मानून पूजा करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत रुढ आहे. शेतातील उंदरांचा साप नाश करतात म्हणून सापाला शेतकऱ्याचा मित्र म्हणतात. प्राणी व पक्षी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सण साजरे करण्याची प्रथा आपल्या संस्कृतीत फार पूर्वीपासून आहे. म्हणून आपल्याकडे नागपंचमी साजरी केली जाते.

फार वर्षांपूर्वी नाग वंशाचे लोक रहात होते. नंतर आर्यांचे भारतात आगमन झाले. आर्य आणि नाग यांच्यात वारंवार भांडणे होत. एकदा अस्तिक ऋषींनी ही भांडणे मिटविली. नाग लोकांनी हा आनंद नाग पुजनाने व्यक्त केला. म्हणून नागपंचमी साजरी केली जाते. अशी एक पुराणात कथा आहे.

नागपंचमीबाबत दुसरी एक अशी कथा आहे की, कृष्ण गायीगुरांसह यमुनेच्या काठावर जात आहे. त्या नदीतील कालिया नावाच्या सापाने गोकुळवासी भयभीत झाले होते. परंतु श्रीकृष्णाने कालियामर्दन केले आणि त्याच्यावर विजय मिळवला. तो दिवस श्रावण पंचमीचा होता. तेव्हापासून नागपंचमीची प्रथा सुरु झाली असेही मानले जाते.

महाराष्ट्रात सांगली जिल्ह्यातील बत्तिसशिराळे इथं नागपंचमीचा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. तेथे जिवंत नाग पकडून त्याची पूजा करतात. नागाची वाजतगाजत मिरवणूक काढतात आणि पूजा झाल्यानंतर परत सोडून देतात. महाराष्ट्रात नागपंचमीचा सण सर्वत्र साजरा केला जातो. घरात नागाची प्रतिमा काढून किंवा नागाच्या मुर्ती आणून पूजा केली जाते. घरात नागाची पूजा केल्यानंतर त्याचे घरात वास्तव्य राहिल म्हणून बाहेर जावून वारुळाची पूजा केली जाते. नागोबाची पूजा करुन त्याला दूध लाह्यांचा नैवेद्य दाखवतात.

या दिवशी नागाला ईजा होवू नये म्हणून शेतकरी शेतात नांगर देखील फिरवत नाही. या दिवशी घरात विळी देखील वापरली जात नाही. या सणाला नववधू माहेरी येतात. झिम्मा फुगडी खेळतात. झाडाला झोके बांधून झोके खेळतात. पूर्वी लहान वयातच मलींची लग्न होत. नववधूंना मोकळेपणानं खेळता यावे, मन मोकळे करता यावे यासाठी पंचमीच्या दिवशी गावाबाहेर झोपाळे बांधण्याची प्रथा आहे.